नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०५/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## केबल वायर चोरी करणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

दि. २९/०५/२०२४ ला स्थानिक गुन्हे शाखेचे पथक काटोल उपविभागात पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ४४६/२४ कलम ३७९ भादंवी गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना मिळालेल्या खबरे वरून संशयित इसम नामे— (१) डेबू डॉन उर्फ सीताराम फागुजी अंबुडारे, वय ५० वर्ष, रा. खुटाबा त. काटोल यास ताब्यात घेऊन गुन्हयाबाबत सखोल विचारपूस केली असता त्याने व त्याचा मुलगा (२) रत्नाकर सीताराम अंबुडारे, वय २८ वर्ष रा खुटंबा. त. काटोल जि. नागपूर व इतर दोन आरोपी नामे— ३) सुभाष तुळशीराम युवनाते, वय ३६ वर्ष, रा. सबकुण्ड (४) पवन शेषराव युवनाते, वय २४ वर्ष. रा. सबकुण्ड त. काटोल जि. नागपूर यांनी मिळून दिनांक २२/०५/२०२४ रोजी रात्रीला अंदाजे ११ वाजेच्या सुमारास कोंढाळी ते सबकुण्ड रोडवरील साई फार्म हाऊस मधील शेड मध्ये ठेवलेले केबल वायर चारही आरोपी मिळून चोरी केली आहे. त्या केबल वायरला फार्म हाऊसच्या बाजूला जंगलात जाळून तांबा काढून टोयोटा क्वालिस गाडी क्र MH-04/ BY-7894 मध्ये टाकून तांबा चोरून ती गाडी आरोपीने आपल्या घराच्या समोर उभी करून ठेवली आहे. अशी कबुली दिल्याने आरोपी सीताराम अंबुडारे याचे ताब्यातून अंदाजे १४ किलो तांबा अंदाजे किंमती १४०००/— रु व १) एक टोयोटा क्वालिस फोरव्हिलर बजाज पल्सर मोटार सायकल अंदाजे किंमती ३,०००००/— रू चा मुद्देमाल असा एकूण ३,१४,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमाल व आरोपी पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कोंढाळी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनी आशिषसिंग ठाकूर, ASI चंद्रशेखर घडेकर, पोहवा प्रमोद तभाने, पो.हवा रणजित जाधव यांनी पार पाडली.

## लोखंडी प्लेटा चोरी करणारे आरोपी अटकेत

पोस्टे मौदा येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पोस्टे मौदा अंतर्गत मौजा डहाळी शिवार हिंडाल्को कंपनी समोर एक संशयितरीत्या वाहन उभे असलेले दिसुन आले. यावरून स्टाफने सदर कारची पाहणी केली असता सदर मारोती स्विफट कार क्र. एम.एच– ४०/बी.एल ९७९१ चा चालक आरोपी नामे– **१) विशाल सुभाष** बागडे वय २६ **वर्ष,** रा. स्नेहनगर मौदा व सोबत असलेला २) प्रितम इंदल सोनवने वय २५ **वर्ष,** रा. लापका रोड मौदा यांचे वाहनामध्ये अंदाजे १५० किलो वजनाच्या ०३ लोखंडी प्लेट मिळुन आले. सदर मुद्देमाला बाबत त्यांना विचारपुस केली असता उडवाउडविचे उत्तरे दिली. अधिक विचारपुस दरम्यान सदर लोखंडी प्लेटा या एन. टी. पी. सी मौदा येथुन चोरी करून आणल्याचे सांगितले. आरोपीतांकडुन १५० किलो वजनाच्या ०३ लोखंडी प्लेट किमती कि. १५००/–रु गुन्हयात वापरलेली कार मारोती स्विफट कार क्र. एम.एच– ४० बी.एल ९७९१ किंमती ५,००,०००/– रु असा एकुण ५०१५००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, पोउपनि महेश बोथले, पोहवा संदीप कडु, पोहवा रूपेश महादुले, पोना दीपक दरोडे, पो अं. अतिश गाढवे, चालक जिवन देवांगन यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**